# समाज माध्यमांवर प्रचाराचा धुमाकूळ

## निवडणूक आयोगाचा कानाडोळा




**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार,( दि.2 )-** विधानसभा निवडूक खर्चावर बारीकसारीक खर्चावरही कटाक्ष ठेवणारे खर्च नियंत्रण पथक समाज माध्यमांवर होणाऱ्या खर्चाकडे कानाडोळा करताना दिसत आहे. समाज माध्यमांवरील प्रचार निवडणूक खर्चात धरल्या जात नाही, धरले तरी नाममात्र हजार ते एक लाख रुपयेच मोजावे लागत असल्याने उमेदवार आणि समर्थकांकडून सोशल अस्त्रालाच जवळ केले जात आहे.

एका क्लिकवर एका सेकंदात लाखो मतदारापर्यंत पोहोचविणाऱ्या या अस्त्राने निवडणूक लढविण्याचे तंत्र बदलले, तरी निवडणूक आयोग बदलापासून लांबच आहे, याचा पुरेपूर लाभ राजकीय पक्ष आणि उमेदवार घेत आहेत. अजुन अर्ज परत घेणे, चिन्ह वाटपाची प्रक्रीया सुरु झालेली नसताना अजून एकही जाहीर सभा झाली नाही. मात्र समाज माध्यमांवर प्रचाराचा अक्षरशः धुमाकूळ सुरू आहे. 2014 च्या लोकसभा निवडणुकीपासून समाज माध्यम प्रचाराचे साधन म्हणून पुढे आले. पुढील पाच वर्षे त्याचा इतका प्रभाव वाढला, की अचलपूर मतदार संघात समाज माध्यमांवर चांगलाच प्रचार, आरोप-प्रत्यारोप सुरू आहे. निवडणुका जाहीर होण्याच्या आधीपासूनच प्रतिस्पर्धींमध्ये सोशल मीडिया सेल कार्यरत झाले असून, तेथून सोशल वॉर रंगविले जात आहेत. जाहीर आरोप-प्रत्यारोपांच्या जोडीनेच जुन्या ऑडिओ, व्हिडीओ क्लीप दाखवून एकमेकांना शह देण्याचे फंडे राबविले जात आहेत. व्हॉटस अॅढप, फेसबुक, यू ट्यूबवरील क्लिप आणि एसएमएसवरून रोज नव्या वादाला तोंड फुटत आहे, तरीदेखील निवडणूक आयोग मात्र हे आपल्या कार्यकक्षेतच नाही या अविर्भावात वावरत आहेत.

### आयोगाची अवस्था `दार उघडे आणि न्हाणीला बोळा'

निवडणूक काळात होणाऱ्या खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी राष्ट्रीय पातळीवरील चार खर्च निरीक्षकांची नियुक्ती झाली आहे. त्यांना साहाय्य करण्यासाठी मतदारसंघनिहाय नोडल अधिकारी नियुक्त केले आहेत; पण सोशल मीडियामार्फत होणाऱ्या वारेमाप खर्चाकडे दुर्लक्ष होत आहे; त्यामुळे आयोगाची अवस्था 'दार उघडे आणि न्हाणीला बोळा' अशीच आहे.



**अमरावती-** आमदार अॅड. यशोमती ठाकूर यांनी आपल्या कुटुंबीयांसोबत दिवाळी साजरी केली. यावेळी आई पुष्पमाला ठाकूर, डॉ. राजीव ठाकूर ( काका ) , उज्वला ठाकूर ( काकू ), नेट्टा डिसुजा, यशेश ठाकूर, ऋुजा ठाकूर, मुलगा यशवर्धन ठाकूर, मुलगी आकांक्षा ठाकूर उपस्थित होते.

# धामणगाव येथे तीन दुकानांना आग

## दिवाळीच्या मध्यरात्री शास्त्री चौकात अग्नितांडव

**महासागर प्रतिनिधी**
**धामणगाव रेल्वे,( दि.2 )-** दिवाळीच्या मध्यरात्री शास्त्री चौकातील पाण्याच्या टाकीजवळ तीन दुकानांना आग लागली. या घटनेत दुकानात ठेवलेले संपूर्ण साहित्य जळून राख झाले.



शास्त्री चौकातील शेख महफूज अब्दुल मजीद यांचे ऑटो, जेसीबी, ट्रक आदी वाहनांच्या सुट्या भागांचे दुकान आहे. नुकतेच त्याने त्या दुकानांचे कर्ज काढून लाखो रुपयांचे स्पेअर पार्ट घेतले होते. मात्र या आगीत त्याच्यासमोर ते सुटे भाग पूर्णपणे जळून राख झाले. तसेच नुकतेच त्यांनी साहित्याने भरलेले विश्वास खंदारे यांचे गादीचे दुकानही जळून खाक झाल्याचे वृत्त आहे. आगीमुळे शेजारील फळांचे दुकानही जळून खाक झाले. तिन्ही दुकानांतील साहित्याची नुकसान झाले आहे. रात्री 12.30 च्या दरम्यान आग लागल्याचे समजताच काही नागरिकांनी तातडीने अग्निशमन दलाला फोन करून माहिती दिली. आगीवर पुन्हा नियंत्रण मिळवले, समोरील काही दुकाने वाचली, अन्यथा मोठा अनर्थ घडण्याची शक्यता होती.

# चांदूर बाजारात चाकूने तरुणांवर प्राणघातक हल्ला

**अमरावती -** कौटुंबिक वादातून एका तरुणांवर चाकूने हल्ला केल्याची घटना चांदूरबाजार तालुक्यातील थुगाव पिंपरी येथे 30 ऑक्टोबर रोजी घडली होती. या घटनेच्या तक्रारीवरून पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. थुगाव पिंपरी येथील रहिवासी मोहम्मद इफ्तेखार यांनी फिर्यादीत म्हटले आहे की, ते पानटपरीवर गेले होते. त्यानंतर त्यांना चुलत भावाचा आवाज आला, त्यावेळी त्यांनी जाऊन पाहिले असता शेख अन्सार व शेखर निसार हे जखमी अवस्थेत पडले होते. त्यांना तात्काळ त्यांना चांदूर बाजारच्या उपजिल्हा रुग्णालयात नेले. यावेळी त्यांनी घटनेबाबत विचारणा केली असता सिकंदर अली, मोहसीन अली, एजाज उद्दीन यांनी जिवे मारण्याच्या उद्देशाने चाकूने हल्ला केल्याचे सांगितले.

# समृध्दी महामार्गावर भीषण अपघात; चिमुकल्यासह पती-पत्नी ठार

## निंभोरा बोडखा गावावर शोककळा | सिंदखेडराजा जवळील पिंपळखुटा शिवारातील घटना

**महासागर प्रतिनिधी**
**धामणगाव रेल्वे, ( दि.2 )** - एकीकडे दिवाळीची सणाला सुरुवात झाली असून दिवाळी सण साजरा करण्यासाठी पुणे येथून आपल्या मूळ गावी निंभोरा बोडखा येथे समृध्दी महामार्गाने येणाऱ्या भीषण अपघातात कारमधील 4 वर्षाच्या मुलासह पती पत्नी ठार झाले. या घटनेमुळे निंभोरा बोडखा गावात शोककळा पसरली आहे.



बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा जवळील पिंपळखुटा शिवारात समृध्दी महामार्गावर हा भीषण अपघात झाला. यात मूळचे तालुक्यातील निंभोरा बोडखा येथील व पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथील वीज महावितरण कंपनीत उपकार्यकारी अभियंता असलेले राजेश दाभाडे (वय 42) पत्नी शुभांगी राजेश दाभाडे (वय 32) आणि मुलगा रियांश राजेश दाभाडे (वय 4) ठार झाले. तर समिक्षा राजेश दाभाडे व कार चालक अश्विन गणोरकर हे दोघे जखमी झाले. दिवाळी सणानिमित्ताने पुणे येथून कारने मूळचे तालुक्यातील निंभोरा बोडखा येथे येत होते. मात्र,अपघातात तिघे जण ठार झाले. सदर घटनेने संपूर्ण गावात शोककळा पसरली असून, सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेमुळे वाठोडा गावात शोककळा पसरली आहे. पश्चात एक मुलगी, आई, वडील, भाऊ व बराच मोठा आप्त परिवार आहे. जिल्ह्यातील वरूड येथे महावितरण कंपनीत उपकार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत होते. त्यांची सहा महिन्यापूर्वीच पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथे बदली झाली होती.

# मामाच्या घरी आलेले दोन सख्खे भावाचा अपघातात मृत्यू

## दुचाकी घसरल्याने झाला अपघात



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 2 )** - कामानिमित्त मामाच्या घरी अमरावतीत आलेल्या दोन सख्ख्या भावांचा दुचाकी घसरून अपघातात मृत्यू झाला. ही घटना गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शान होंडाच्या शोरूमसमोर गुरुवारी रात्री 10.30 वाजता घडली. मृतांमध्ये चेतन सोहनलाल राठोड (32) आणि रोहन सोहनलाल राठोड (24, दोन्ही रा. नांदेड) यांचा समावेश आहे. दिवाळीच्या पूर्वसंध्येला सख्ख्या भावांचा मृत्यू झाल्याने विलास नगरात शोककळा पसरली होती. पोलीस सूत्रांनुसार, चेतन आणि रोहन हे दोघे भाऊ दिवाळीच्या दिवशी आपल्या मामाच्या घरी विलासनगर परिसरात आले होते. गुरुवारी रात्री चेतन, सोहन व अन्य दोन तरुण असे चौघेजण दोन दुचाकींवर हॉटेलमध्ये जेवण करण्यासाठी गेले होते. येथून परतत असताना गाडगेनगर नगरातील शान होंडा शोरूमजवळ दुचाकी रस्त्यावर घसरली. त्यामुळे चेतन आणि रोहन हे दोघे दुचाकीवरून थेट महाविद्यालयाच्या भिंतीवर आदळले. अपघात घडल्याचे पाहताच आजूबाजूच्या लोकांनी त्यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल केले. पासणीनंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

# पक्षाच्या उमेदवारासाठी अर्ज मागे घेणार

## भाजप जिल्हा उपाध्यक्ष श्रीधर सोलव यांनी केले जाहीर

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.2 )-** 20 नोव्हेंबरला होऊ घातलेल्या विधानसभेच्या निवडणुकीकरिता मोर्शी-वरुड विधानसभा मतदार संघातून उमेदवारी अर्ज दाखल केला होता. परंतु भारतीय जनता पार्टीची उमेदवारी चंदू उर्फ उमेश यावलकर यांना मिळाल्यामुळे मी भारतीय जनता पार्टीचा जिल्हा उपाध्यक्ष या नात्याने चंदू यावलकर यांना मदत करण्यासाठी येत्या 4 नोव्हेंबरला उमेदवारी अर्ज मागे घेणार असल्याचे श्रीधर सोलव यांनी जाहीर केले. शनिवार दिनांक 2 नोव्हेंबर रोजी बारगाव येथे झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.



श्रीधर सोलव यांनी 400-500 कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत चंदू यावलकर यांना जाहीर पाठिंबा भारतीय जनता पार्टीच्या उमेदवाराची बाजू भक्कम झाली असल्याची चर्चा आता सुरू झाली आहे. दिल्यामुळे भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी तसेच श्रीधर सोलव यांच्या समर्थकांनी त्यांचे स्वागत केले आहे. त्यामूळे यावलकर यांना बंडखोरीची भीती उरली नाही.

# महिलेच्या घरातून 12 लाखांचे दागिने उडविले

## गाडगेनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 2 )** - गाडगेनगर पोलीस ठाणे हद्दीतील रहिवासी असलेल्या एका महिलेच्या घरातून 12 लाख रुपये किमंतीचे सोन्याचे दागिने अज्ञात चोराने लंपास केले. याप्रकरणात महिलेच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

तक्रारदार महिला ही विलास नगर गल्ली क्रमांक 1 मधील रहिवासी असून, 13 मे 2024 रोजी त्यांनी सोन्याचे ताट 50 ग्रॅम, मंगळसूत्र 35 ग्रॅम, 2 कानातले 10 ग्रॅम, 2 बदामीच्या अंगठ्या 5 ग्रॅम, लहान मंगळसूत्र 15 ग्रॅम, सोन्याचा हार 12 ग्रॅम असे सर्व 12 लाख रुपये किमंतीचे दागिने बेडरूमच्या ड्रॉवरमध्ये ठेवले होते. दिवाळीपूर्वी 31 ऑक्टोबर रोजी त्यांनी दागिन्यांची बॅग पाहिली असता, त्यांना ती दिसली नाही. तक्रारदार महिलेच्या पतीचे नुकतेच निधन झाले होते. त्यामुळे घरी तेरवीचा कार्यक्रम होता. दरम्यान, घरात राहून कुटुंबातील कुण्यातरी व्यक्तीने दागिने चोरले असावे, असा संशय महिलेने पोलिसात दिलेल्या तक्रारीतून व्यक्त केला आहे. याप्रकरणात पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध कलम 305 (अ) अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### परमार ले-आऊटमध्येही चोरी

राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अकोली मार्गावरील परमार ले-आऊट येथे राहणारी महिला सासूच्या वार्षिक श्राद्धासाठी घराला कुलूप लावून गावी गेली होती. दरम्यान, अज्ञात चोरट्यांनी कुलूप तोडून 1 लाख 50 हजार रुपये किमतीचे 30 ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र, 30 हजार रुपये किमतीची 5 ग्रॅम सोन्याची अंगठी, 1 लाख रुपये किमतीची 20 ग्रॅम सोन्याची चेन, 50 हजार रुपये रोख, असा एकूण 3 लाख 30 हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. चोरले होते. महिलेच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# डॉ.निलेश विश्वकर्माचे मतदारांच्या मनावर अधिराज्य!

## पळसखेड, सोनोरा, भिलटेक, सावंगी गावात प्रचारयात्रेला प्रचंड प्रतिसाद

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे,( दि.2 ) -** वंचित बहुजन आघाडी चे अधिकृत उमेदवार, युवा नेतृत्व निलेश विश्वकर्मांचे मतदारांच्या मनावर अधिराज्य दिसत आहे, प्रचार यात्रेदरम्यान चांदूर तालुक्यातील पळसखेड, सोनोरा, भिलटेक, सावंगी गावात त्यांना नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. अबालवृध्दासह सर्वांनी या युवा उमेदवाराचे जल्लोषात स्वागत केले.



चांदूर रेल्वे तालूक्याती पळसखेड, सोनोरा, भिलटेक, सावंगी गावात रॅली चे आयोजन करण्यात आले. संपूर्ण गावातून रॅली काढण्यात आली. या येथील महिलांनी आपले पारंपारिक नृत्य सादर करत विश्वकर्मा यांचे स्वागत केले. कोरोना काळात डॉ. निलेश विश्वकर्मा यांनी केलेले कार्य जनता विसरत नाही असेही मतदारांनी या वेळी बोलून दाखवले. विशेषता युवा मतदारांनी मोठ्या संख्येनी उपस्थित राहून लोकांच्या समस्या डॉ. निलेश विश्वकर्मा त्यांनी ऐकून घेऊन निवडून आल्यावर आपण या समस्येवर तातडीने तोडगा काढू असे आश्वासन मतदारांना दिले. आजी माजी आमदार मतदार संघात कोट्यावधी रुपयाचा निधी आल्याचे मतदारांना सांगतात परंतु चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे, नांदगाव खंडेश्वर या तिन्ही तालुक्यात कुठल्याही प्रकारची विकास कामे झाली नाही. मतदारांना फक्त खोटे आश्वासन देण्यात येत आहे. डॉ. निलेश विश्वकर्मा युवा व तडफदार उमेदवार असून विशेषता युवा वर्ग त्यांच्या कडे आकर्षित होत आहे. मतदारांनी त्यांना या विधान सभेच्या निवडणुकीत निवडून आणण्याचा एक प्रकारे चंगच बांधला आहे. डॉ. निलेश विश्वकर्मा यांना मतदार संघात मिळत असलेला प्रचंड प्रतिसाद पाहता विरोधकांची झोपच उडाल्याचे चित्र आहे. प्रचार यात्रेला यावेळी पळसखेड येथील अभय कांबळे, प्रफुल देशमुख, सुभाष घोडेस्वार मनोज राऊत, निलेश रामटेके, हेमंत, मेश्राम, सचिन राऊत, संजय देशमुख, सुनील वासनिक, विनायक मोहोड, ओमप्रकाश मडावी तर सावंगी संगम येथील अमित चौधरी, राजेंद्र नेवारे, दिलीप हरणे सोनोरा बु. येथील अनाजी सागरकर, गजानन शेलोकार धनराज मेहरे, अमित मोखडे तर भिलटेक येथील सुनील राऊत, दिपक शिंदे, अभय रामटेके, दिलीप तायडे, विनायक नान्देकर यांच्या सह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# 400 वर्षापासून मोर्शीकरांनी जपून ठेवली धेंडाई काढण्याची प्रथा!

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.2 )** -येथे शहरात दिवाळीच्या रात्री धेंडाई काढण्याची प्रथा 400 वर्षांपासून जपली जात आहे. येथे धेंडाईची वेगवेगळी चार मंडळे असून त्यात काही वंशपरंपरेने चालत आलेली आहेत.धेंडाई हा एक आगळावेगळा व पारंपरिक प्रकार मोर्शी शहरात पहायला मिळतो.



जिल्ह्यातील सावंगा येथून धेंडाई काढण्यास सुरूवात झाली असे ग्रामस्थ सांगतात.राज्यात अवधुती पंथ, वैष्णवीपंथ आणि महानुभाव पंथ असे तीन पंच प्रामुख्याने मानले जातात.त्यापैकी अवधुती पंथाने धेंडाईची सुरूवात केली. धेंडाई ही संपूर्ण लाकडापासून पालखीसारखी बनविलेली असते.दोन माणसांना उचलता येईल अशी समोर आणि मागच्या बाजूला काठ्यांची व्यवस्था केली असते. धेंडाईमध्ये एकूण 85 दिवे लावले जातात. दिव्यांची संख्या पुरातन काळातील चौसर या खेळावरून घेण्यात आली आहे. चौरसमध्ये 84 घरे असतात म्हणजेच एक भागामध्ये 21 घरे असतात. याच आधारावर धेंडाईच्या एका भागामध्ये 21 दिवे असतात,चार भाग मिळून 84 आणि एक दिवा धेंडाईच्या मधात अशा एकूण 85 पणत्या लावण्यात येतात. धेंडाईच्या वरच्या टोकावर गवताचा प्रकार असलेल्या लईपासून बनविलेली रई व त्या रईमध्ये भाताचा दिवा लावलेला असतो.अंधार,अज्ञान व गरिबीवर मात करण्याच्या उद्देशाने ही धेंडाई रात्री घरोघरी फिरविली जाते.यावेळी घराघरातील महिला या धेंडाईची पुजा करतात नंतर आरती होऊन ती धेंडाई समोर निघून जाते.झेंडू तयाचे चित्तरंगास्त वत्सव दिनया राजाचे, कुपची काठी कुपची जळ गाई म्हशीन वाडे भरले,गायी म्हशीने भरले वाडे,विघ्न नामाने उडाले% या सारख्या अनेक ओव्या गायिल्या जातात. दुसऱ्या दिवशी धेंडाईची सांगता होते. अधिक मासात महाप्रसादाचा कार्यक्रम ठेवण्यात येतो. पहिली धेंडाई सुलतानपुऱ्यातील बजरंगबली संस्थान येथून दुसरी माळीपुऱ्याच्या रामजीबाबा संस्थान येथून, तिसरी दिव्यज्योती धेंडाई मंडळ आणि चौथी धेंडाई महादेवराव गहुकार यांच्या घरून निघते.ही परंपरा मोर्शी वासियांनी मोठ्या आनंदाने जपली आहे. सावंगा येथून आलेल्या ही धेंडाई गावागावात पोहचली आहे. शिरजगाव, अंबाडा, नेरपिंगळाई, ब्राह्मणवाडा, हिवरखेड या गावातून धेंडाई निघत होती. मोर्शीकरांनी मात्र ही प्रथा आजही जोपासून ठेवली.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# माझे राजकारण जात-पात किंवा गटबाजीवर केंद्रीत नाही!

## आमदार नसतानाही कोट्यवधी रुपयांचा विकास केला- कॅ.अभिजीत अडसुळ

रोहित गासे



*अमरावती,( दि.2 )- माझे विरोधक माझा पराभव करण्याकरिता काय व्युव्हरचना करतात, कुणाला अपक्ष उभं करतात, जात-पातीचे काय राजकारण करतात, गटबाजीला कसे प्रोत्साहन देतात, याच्याशी मला काही एक देणंघेणं नाही, कारण माझे राजकारण जात-पात किंवा गटबाजीवर केंद्रीत नाही. मी आमदार असताना किंवा आमदार नसताना केलेला विकास जनतेला माहित आहे, हाच विकास पाहून जनता मला विजयी करेल, यात तिळमात्रही शंका नाही, असा पोलादी विश्वास दर्यापूर विधानसभा मतदारसंघात निवडणूकीच्या रिंगणात असलेले शिवसेनेचे ( शिंदे गट ) उमेदवार तथा माजी आमदार कॅ.अभिजीत आ.अडसुळ यांनी व्यक्त केला. दै.महासागर ला दिलेल्या एका मुलाखतीमध्ये त्यांनी केलेल्या विकास कामांचा लेखाजोखा मांडला.*

### महासागर ला दिली विशेष मुलाखत

**प्रश्न-10 वर्षानंतर पुन्हा एकदा निवडणूकीला सामोरे जात आहात, काय आव्हानं असतील ?**

कॅ.अडसुळ- मी 2009 ते 2014 या पंचवार्षिक मध्ये आमदार होतो. तेव्हा 80 ते 100 कोटींचा विकास केला. गावागावात आजही मी केलेली कामे गावकरी मला दाखवितात. सन 2014 मध्ये पराभूत झाल्यानंतरही मतदारसंघाशी जुळलेली असलेली माझी नाळ तुटली नाही. माझे कामे सुरुच होती. आमचे नेते एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर माझ्या कामाला आणखीनच वेग आला. दर्यापूर मतदारसंघात एमआजीएसचे कामे मार्गी लावली, वासुदेव सहकारी सुतगिरणी पुनर्जीवीत केली, श्री क्षेत्र मुऱ्हा देवी 3 कोटीच्या वर निधी मिळवून दिला, ग्रामपंचायतींना विकास कामांकरिता भरभरुन निधी मिळवून दिला. ग्राम मलकापूर, खल्लार, कमालपूर येथे पुल बांधले, सरपंच सेवा संघाचे लोक माझ्याकडे मागणी घेवून आले, मी ते मुख्यमंत्र्यांकडे मांडली आणि आठ दिवसात त्या मागणीवर निर्णय घेत सरपंचांचे वेतन दुप्पट करण्यात आले, त्याच कोतवाल, अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्याही वेतनात घसघशीत वाढ झाली. गावांमध्ये अनेक रस्त्यांची निर्मीत केली, हा सर्व विकास मी आमदार नसताना केला, आमदार असल्यावर तर मतदारसंघाची दशा पालटून टाकेल, असे असताना मला वाटत नाही माझ्या समोर कुठले आव्हानं उभे आहेत म्हणून.

**प्रश्न- बाहेरचे असल्याचा आरोप तुमच्यावर विरोधक करतात ?**

अ.अडसुळ-मी बाहेरचा असतो तर इतके शिवसैनिक माझ्या सोबत असते का?, मी मतदारसंघात इतका विकास केला असता का?, असा प्रश्न मला आरोप करणाऱ्यांना विचारायचा आहे. एकनाथराव शिंदेच्या सोबत जेव्हा शिवसेना गेली, तेव्हा महाराष्ट्रात सर्वात आधी दर्यापूरात 300 ते 400 शिवसैनिकांची फळी आमच्यासोबत होती. कोण काय म्हणतो, मी त्याकडे लक्ष देत नाही. फक्त मतदारसंघात विकास कसा करता येईल यावर माझा भर असतो.

**प्रश्न-आरोप आहे, निवडणूक जवळ आली की, तुम्ही मतदारसंघात येता ?**

अ.अडसुळ- कोणत्याही आमदाराला आठवड्यातील चार दिवस मुंबईत रहावे लागते, तेव्हा मतदारसंघाकरिता जास्तीत जास्त निधी आणता येतो, मी आमदार नसतानाही मतदारसंघात निधी आणत आहे, याकरिता मला मुंबईत राहणे भाग आहे. आमदार झाल्यावर मला आठवड्यातून चार दिवस मुंबईत रहावेच लागेल. त्यामूळे कुणी काय म्हणतो याला अर्थ नाही.

**प्रश्न-विजयाचा विश्वास किती ? तुमचा जाहिरनामा कसा आहे ?**

अ.अडसुळ- मला माझ्या विजयाचा 110 टक्के विश्वास आहे. निवडूण आल्यावर मतदारसंघातील अंबा साखर कारखाना, गाडगेबाबा सुतगिरणी सुरु करणे प्राथमिकता राहील. एमआयडीसीच्या विस्तारिकरणासह तेथे उद्योग आणने, हायटेक हॉस्पीटल आणने, एमबीबीएस, एमडी डॉक्टरांनी सज्ज रुग्णालये स्थापन करायचे आहेत. तीर्थक्षेत्रांचा विकास करणे, रस्ते, पांदन रस्त्यांची निर्मीती करणे प्राथमिकता राहील.

# आतापर्यंतच्या सरकारकडून उपेक्षा, परिवर्तन महाशक्तीकडून अपेक्षा!

## शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी प्रहारची तळमळ सर्वश्रुत



महासागर प्रतिनिधी

**अमरावती,( दि.2 )-** स्वातंर्त्यप्राप्तीच्या काळापासून तर आजवर अनेक सरकार आलीत आणि गेलीत मात्र शेतकऱ्यांच्या घामाला दाम देणारे एकही सरकार आजपर्यंत आले नाही. केंद्रात किंवा राज्यात कॉंग्रेस, भाजप, शिवसेना यांनी सत्ता भोगली परंतु शेतकऱ्यांच्या नावावर सत्तेची चाबी घेणाऱ्या नेत्यांनी कायम शेतकऱ्यांची उपेक्षा केली. सद्यस्थितीचा विचार केला तर केंद्रात आणि राज्यात भाजप, महायुतीचे सरकार आहे मात्र या सरकारने सुद्धा शेतकऱ्यांची घोर निराशा केली आहे.राज्यात सध्या तिसऱ्या परिवर्तन महाशक्तीने प्रवेश केला असून शेतकऱ्यांच्या मुद्द्यावर ही आघाडी प्रामुख्याने मतं मांडत आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी प्रहारची तळमळ सर्वश्रुत असल्याने परिवर्तन महाशक्तीकडून आता शेतकऱ्यांच्या अपेक्षा वाढतांना दिसत आहे.

एकीकडे महागाईचा भस्मासुर वाढला असतांना शेतकरी मात्र अस्मानी आणि सुलतानी संकटात सापडलेला आहे.शेतकऱ्यांना शेतीच्या मशागतीसाठी लागणारे साहित्य, औषधी, बियाणे आदींची चौपटीने किमती वाढल्या मात्र शेतकऱ्यांनी कष्टाने आणि घामाने पिकवलेल्या मालाला आजही बारा वर्षांपूर्वीचेच भाव मिळत आहे. वीस वर्षात चारशे रुपयांना मिळणारी शेतीची औषधी अठराशे रुपयांना मिळते मात्र आजही शेतकऱ्यांचा माल बारा वर्षांपूर्वी असलेल्या दराने विकत घेतल्या जातो त्यामुळे शेतकरी कसा जगणार असा प्रश्न निर्माण होतो आहे.

शेतीशी किंवा शेतकऱ्यांशी निगडित सर्व साहित्य व वस्तूंचे भाव आज चार पटीने वाढलेत परंतु शेतकरी दरवर्षी केवळ भाव वाढणार चांगले दाम मिळणार याच आशेने जगतो आहे. एकीकडे शेतीच्या साहित्य आणि औषधींचे भाव वाढवायचे आणि शेतकऱ्यांना अनुदान म्हणून वर्षाला अठरा हजार अनुदान द्यायचे व स्वत:च शेतकऱ्यांचा कैवारी म्हणून शासनाने पाठ थोपटायची हा प्रकार सध्या सुरू आहे.मात्र शेतकऱ्यांना हे कळून चुकलंय की,आपलाच पैसा योजनेच्या नावाखाली आपल्याला परत मिळतोय.विधानसभेमध्ये विदर्भातील बच्चू कडू यांच्या व्यतिरिक्त एकही आमदार असा नाही की, त्यांनी शेतकऱ्यांचा प्रश्न मांडला असेल.

बच्चू कडू व राज्यातील काही महत्वाच्या नेत्यांची निर्माण झालेली परिवर्तन महाशक्ती ही शेतकऱ्यांचे नेतृत्व करणारी आघाडी असल्याचे बोलल्या जाते. सहजीकच आहे की त्या आघाडीत बच्चु कडू सारखा धुरंदर नेता असल्याने शेतकरी, शेतमजूर,दिव्यांग आणि वंचित घटकांना न्याय मिळेल मात्र आज संकटात असलेल्या शेतकऱ्यांसाठी ही तिसरी आघाडी पोषक असेल किंवा कसे याबाबत तूर्तास निर्णय घेणे कठीण आहे मात्र याव्यतिरिक्त कोणताही सक्षम पर्याय सध्यातरी शेतकऱ्यांच्या बाजूने नाही असे स्पष्ट दिसत आहे.

### शेतकऱ्यांचा कुणी वाली नाही

आज शेतकरी वर्ग प्रचंड तणावाखाली जगत आहे. एकीकडे सरकार योजनांचा भडिमार करत आहे तर दुसरीकडे शेतकऱ्यांचा हक्क हिरावून घेत आहे.दरवर्षी शेतकऱ्यांना सरकारकडून अपेक्षा असतात मात्र घोर निराशा शेतकऱ्यांच्या पदरी पडत आहे. आज सरकारने शेतकऱ्यांच्या शेतीला लागणाऱ्या सर्व वस्तूंचे भाव वाढवले मात्र शेतीमालाचे साधे हमीभाव देखील शेतकऱ्यांना मिळू नये हे महायुती सरकारचे धोरण आहे.सरकार कोणतेही असो शेतकऱ्यांचा कुणीही वाली नाही त्यामुळे यापुढे जो व्यक्ती केवळ शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढणार त्यालाच आम्ही विधानसभेत पाठवणार

**संजय मुंडाणे,**
**शेतकरी सर्फाबाद**

### आमची लढाई शेतकऱ्यांच्या हक्कासाठी- बच्चू कडू

आम्ही सातत्याने शेतकरी, शेतमजूर यांचा आवाज विधानसभेत मांडतो आहे. गेली वीस वर्षे येथील शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आम्ही लढाई लढतो आहे, शेतकरी, शेतमजूर यांच्यासाठी आम्ही सत्ताधारी, विरोधक दोघांसोबत राहून शेतकरी वर्गाला न्याय देण्याचा पुरेपूर प्रयत्न केला आहे मात्र ही व्यवस्था खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या विरोधात आहे या व्यवस्थेविरोधात आता आम्ही पूर्ण ताकदीने या निवडणुकीत उभे असून महाविकास आणि महायुती या दोघांना बाजूला सारून आम्ही परिवर्तन महाशक्ती निर्माण केली आहे. आणि ही परिवर्तन महाशक्ती शेतकऱ्यांच्या जीवनात नक्कीच परिवर्तन आणेल असा आम्हाला ठाम विश्वास आहे.

## बडनेरा खर्च तपासणीचे वेळापत्रक जाहीर

**अमरावती-** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 च्या अनुषंगाने खर्च निरीक्षक यांच्याशी चर्चा करून प्रत्येक उमेदवाराची खर्च नोंदवही तपासणीसाठी वेळापत्रक तयार करण्यात येत आहे. बडनेरा विधानसभा मतदारसंघातील सर्व उमेदवारांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन 37 -बडनेरा विधानसभा, मतदार संघाचे उपजिल्हाधिकारी महसूल तथा निवडणूक निर्णय अधिकारी विवेक जाधव यांनी केले आहे.

पहिली तपासणी दि. 7 नोव्हेंबर 2024 रोजी दुपारी 2.30 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत, दुसरी तपासणी दि. 11 नोव्हेंबर 2024 रोजी दुपारी 2.30 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत, तिसरी तपासणी दि. 15 नोव्हेंबर 2024 रोजी दुपारी 2.30 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत राहील. तपासणीचे ठिकाण निवडणूक खर्च तपासणी कक्ष,उपविभागीय अधिकारी कार्यालय, जुनी अमरावती तहसिल कार्यालय, अमरावती येथे राहील.

# राजुरा पारधी बेडावरील गावठी दारू केली नष्ट

महासागर प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 2) -** फ्रेजरपुरा पोलिसांनी गुरुवारी राजुरा पारधी बेडावरील गावठी दारू विक्रेत्यावर कार्यवाही करून, त्यांच्याजवळील 8300 लीटर मोहाचा सडवा व लोखंडी, फायबरचे ड्रम असा एकुण 3 लाख 10 हजाराचा मुददेमाल नष्ट केला. या कारवाईमुळे अवैध दारू विक्रेत्यांचा धाबे दणाणले होते.



विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यात आदर्श आचार संहीता लागू करण्यात आली असुन, त्याअन्वये पोलिस आयुक्त यांनी अमरावती शहरातील सराईत गुन्हेगार, अवैध व्यवसाय करणारे गुन्हेगार, गावठी दारू तयार करणारे व विक्री करणारे आरोपी यांचेविरूध्द कठोर कार्यवाही करून त्यावर प्रतिबंध करणेबाबत आदेशीत केले होते. या अनुषंगाने फ्रेजरपुर्याचे पोलिस निरीक्षक निलेश करे, पोलिस निरीक्षक निलेश गावंडे यांच्या नेतृत्वात अधिकारी व अंमलदार यांच्या पथकाने राजुरा पारधी बेडा येथे अवैध दारू विक्री प्रतिबंध मोहिम घेतली. यामध्ये संशयीत रमेश अप्पा चव्हाण (36, रा. पारधी बेडा, अमरावती) हा हातभटटीची दारू तयार करण्याच्या साहीत्यासह आढळून आला.

# दर्यापुरातुन शेगाव वारीचे प्रस्थान उद्या

## रिद्धी सिद्धी गणेश मंदिर व रामदेव बाबा मंडळाचे आयोजन

महासागर प्रतिनिधी

**दर्यापूर, ( दि.2 )-** दर्यापुरातुन शेगाव वारीचे प्रस्थान येत्या 4 नोव्हेंबरला रिद्धी सिद्धी गणेश मंदिर व रामदेव बाबा मंडळ बनोसा यांच्या वतीने करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा मोठ्या उत्साहपूर्ण वातावरण होत असते. या मानाच्या पालखीला 21 वर्षे पूर्ण झाले आहे. 22 व्या वर्षात पदार्पण होत आहे. ही पालखी रिद्धी सिद्धी गणेश मंदिर आयेशा टॉवर सिविल लाईन येथून सोमवार दिनांक 4 नोव्हेंबर रोजी सकाळी 5 वाजता मार्गस्थ होणार आहे. या पालखी सोहळ्यात शिस्त व सर्व सेवा सुविधा भक्तांना उपलब्ध करून दिल्या जात असतात. दर्यापूर वरून मार्गक्रमण या दिंडीचे होत असते सासन फाटा , लोतवाडा, भीम टेकडी



,दहीहंडा, केळीवेळी फाटा ,गांधीग्राम शाळा ,अंदुरा हनुमान मंदिर, लोहारा फाटा, दुर्गा माता मंदिर शेगाव ,त्यानंतर गजानन महाराज मंदिर येथे पालखी मार्गक्रमण करणार आहे. तरी वारकऱ्यांना सहभागी होण्यासाठी संजय चव्हाण, राजा बुंदिले ,सुधीर पवार, यांच्यासोबत संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.









